नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १७२ Issue - 172 | वार - गुरुवार दि. १९ नोव्हेंबर २०२६ Blow- Thursday Date 19 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

चक्रीवादळाचे संकट; आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला सतर्कतेचा इशारा

२२ नोव्हेंबरपर्यंत दक्षिण भारत, मध्य भारत, ईशान्य भारत आणि पूर्व भारताच्या अनेक भागात पावसाचा इशारा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

हैदराबाद : देशात गेल्या महिन्यात अर्णब चक्रीवादळ निर्माण झाल होतं. अक्कान चक्रीवादळ बंगालच्या खाडीमध्ये वातावरणात बदल पाहायला मिळत आहे. बदलत्या वातावरणाचा परिणाम हा चक्रीवादळात रुपांतरीत होत आहे. बंगालच्या खाडीमध्ये सध्या अक्कान नावाचं चक्रीवादळ तयार होत आहे. भारतीय हवामान विभागाकडून या संदर्भात शक्यता वर्तवण्यात आली आहे. याचा परिणाम म्हणून १९ नोव्हेंबरला याचा वेग वाढू शकतो. अति तीव्र चक्रीवादळामध्ये याच रूपांतर होऊ शकत असा अंदाज आहे. हे चक्रीवादळ पुढे सरकत सरकत २० नोव्हेंबरला आंध्रप्रदेशच्या किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे.



भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी सकाळी ५:३० वाजता, दक्षिण- मध्य आणि पश्चिम -मध्य बंगालच्या उपसागरावर अक्कान चक्रीवादळ आहे. हे चक्रीवादळ उत्तर-वायव्य दिशेने हळूहळू सरकत आहे. मागील काही तासांपासून ताशी ७ कीमी वेगाने पुढे सरकत आहे. या चक्रीवादळचा परिणाम अनेक राज्यांना होणार आहे. २० नोव्हेंबरला अक्कान चक्रीवादळ हे आंध्रप्रदेशच्या किनारपट्टीवर धडकणार आहे. दुपारपर्यंत नरसपूर, पुरी, उत्तर आंध्रप्रदेश, यानम आणि दक्षिण ओडिशाची किनारपट्टी पार करण्याची शक्यता आहे. पुढील चार दिवसांत तामिळनाडूच्या आणि आंध्रप्रदेशच्या अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने २२ नोव्हेंबरपर्यंत दक्षिण भारत, मध्य भारत, ईशान्य भारत आणि पूर्व भारताच्या अनेक भागात पावसाचा इशारा दिला आहे. हवामान विभागाने पावसासोबतच हवामान धुक्याचा इशारा देखील दिला आहे. हरियाणा, चांदीगड, दिल्ली आणि पंजाबमध्ये २० नोव्हेंबरपर्यंत दाट धुके पडण्याची शक्यता आहे. बंगालच्या खाडीत तयार होत असलेल्या अक्कान चक्रीवादळामुळे बंगालच्या उपसगरातील समुद्र खवळला आहे त्याची स्थिती ही बदलू शकते. त्यामुळे हवामान विभागाने मच्छिमारांना समुद्रात न जाण्याचा इशारा दिला आहे. किनारपट्टीवरील सखल भागांमध्ये समुद्राचे पाणी शिरण्याचा धोका आहे. या चक्रीवादळाचा महाराष्ट्रावर थेट परिणाम होणार नाही. राज्यातील हवामानावर त्याचा प्रभाव काही प्रमाणात जाणवू शकतो. या चक्रीवादळामुळे विदर्भ आणि मराठवाड्यात पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. सध्या तरी राज्यात कडाक्याची थंडी वाढली आहे.

कुलगामच्या मास्टरमाइंडला कंठस्नान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



श्रीनगर : जम्मू आणि काश्मीरमधील कुलगाम येथे सुरक्षा दलांनी एका चकमकीत लश्कर-ए-तोयबाचा कमांडर लतीफ अहमद भट याला ठार केले आहे. बुधवारी (१८ नोव्हेंबर) पहाटे कुलगाम जिल्ह्यात सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. यादरम्यान, सैनिकांनी लतीफला घेरले आणि आत्मसमर्पण करण्यास सांगितले. मशिदीत लपून बसलेल्या लतीफ भटने आत्मसमर्पण करण्यास नकार दिल्यानंतर तो चकमकीत ठार झाला. तो सीआरपीएफच्या चौकीवरील हल्ल्यात सामील होता आणि त्याचा शोध सुरू होता. अशातच सुरक्षा दलाने त्याला कंठस्नान घालत मोठी कारवाई केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरक्षा दलांनी बुधवारी शोधमोहीम सुरू केली होती. दरम्यान, सुरक्षा दलाचा एका दहशतवाद्याशी सामना झाला. मंगळवारी रात्री उशिरा गुप्त माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी परिसरात घेराबंदी आणि शोधमोहीम सुरू केली. त्यानंतर, बुधवारी पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास जंगलपोरा परिसरात गोळीबार झाला.

अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, परिसरात लश्कर-ए-तोयबाचा कमांडर लतीफ भट याची उपस्थिती लक्षात आल्यानंतर सुरक्षा दलांनी ही कारवाई सुरू केली. संपूर्ण परिसर घेराव घालण्यात आला होता. भट मशिदीत अडकला होता आणि त्याला आत्मसमर्पण करण्यास सांगितले होते. अधिकाऱ्यांनी सांगितले की, संशयित दहशतवादी जंगलपोरा येथील मशिदीत अडकला होता. सुरक्षा दलांनी त्याला आत्मसमर्पण करण्यास सांगितले आहे, परंतु त्याने नकार दिला आहे. यामुळे गोळीबार झाला आणि त्यात त्याचा मृत्यू झाला.

दरम्यान, ११ नोव्हेंबर रोजी, जम्मू आणि काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यातील नौपुरा मीर बाजार येथील केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) चौकीवर दोन सशस्त्र दहशतवाद्यांनी गोळीबार केला. या हल्ल्यात तीन जवान जखमी झाले होते. उमर निसार दारने लतीफ भटसोबत मिळून सुरक्षा दलांवर हल्ले करण्यासाठी लक्ष्य निश्चित करण्याकरिता मीर बाजार, अखरान, हब्लिश आणि किलम यांसारख्या अनेक ठिकाणांची टेहळणी केली होती. ११ नोव्हेंबर रोजी, उमर निसार दारने लतीफ भटसोबत मिळून हा हल्ला केला आणि त्यानंतर तो फरार झाला होता. लश्कर-ए-तोयबाचा कमांडर लतीफ अहमद भट जम्मू आणि काश्मीरच्या विविध भागांमध्ये छोटे हल्ले करत असे आणि स्थानिक लोकांमध्ये मिसळून कोणाच्याही नजरेत न येता वावरत असे. त्याला शोधणे अत्यंत कठीण होते. तो २०२० मध्ये घरातून निघून गेला होता. लतीफ काश्मीरमधील अनेक हल्ल्यांमध्ये सामील होता. त्याच्यावर स्थलांतरित मजुरांच्या हत्येचाही आरोप आहे. तो कुलगामचा रहिवासी आहे. त्याचे कुटुंब खेवन चादर या गावात राहते.

महायुतीत महामंडळ वाटपाचा निर्णय; इच्छुकांची प्रतीक्षा संपणार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : महायुती सरकारमध्ये सत्तेतील वाटा मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या घटक पक्षांतील इच्छुकांसाठी महामंडळांवरील नियुक्त्यांच्या हालचालींना वेग आला आहे. रखडलेल्या नियुक्त्यांपैकी जास्तीत जास्त नियुक्त्या येत्या १५ डिसेंबरपर्यंत करण्याचा महायुतीचा प्रयत्न असल्याची माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी दिली. महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीत महामंडळ नियुक्त्यांसह जिल्हा नियोजन समित्या, राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांना मदत या विषयांवरही चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

समन्वय समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी ही बैठक झाली. मंत्री दादा भुसे, हसन मुश्रीफ, गिरीश महाजन यांच्यासह महायुतीतील प्रमुख नेते उपस्थित होते. महामंडळांच्या माध्यमातून विकासकामे आणि लोकहिताची कामे करता येत असल्याने नियुक्त्यांची प्रक्रिया लवकर पूर्ण करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. जास्तीत जास्त सभासदांच्या नियुक्त्या १५ डिसेंबरपर्यंत करण्याचा प्रयत्न असल्याचे भुजबळ यांनी सांगितले.

महायुतीतील घटक पक्षांच्या नेत्यांकडून एकमेकांविरोधात होणारी वक्तव्ये आणि आरोप यांनाही बैठकीत आळा घालण्याचा निर्णय घेण्यात आला. कोणत्याही पक्षाच्या आमदाराने, मंत्र्याने किंवा पदाधिकाऱ्याने आघाडीतील अन्य घटक पक्षांविरोधात वावगे भाष्य करू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. एखाद्या नेत्याला किंवा आमदाराला काही अडचणी असतील, तर त्यांनी त्या मुख्यमंत्री किंवा आपापल्या पक्षातील वरिष्ठ नेत्यांकडे मांडाव्यात. माध्यमांमध्ये एकमेकांविरोधात वक्तव्य करण्याऐवजी पक्षांतर्गत चर्चा करून प्रश्न सोडवावेत, असे आवाहन करण्यात आल्याचे भुजबळ यांनी सांगितले.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांविरोधात चुकीची वक्तव्ये किंवा आरोप केले जात असतील, तर महायुतीतील तिन्ही पक्ष एकत्र येऊन त्याचा मुकाबला करतील, असा इशाराही त्यांनी दिला. मर्यादा सोडून कोणी बोलत असेल, तर त्याला प्रत्युत्तर देण्याची जबाबदारी तिन्ही पक्षांचे नेते, आमदार आणि कार्यकर्ते पार पाडतील. लोकशाहीच्या नावाखाली सगळेच खपवून घेतले जाणार नाही, असे भुजबळ यांनी स्पष्ट केले.

जिल्हा नियोजन समित्यांच्या स्थापनेबाबतही चर्चा

जिल्हा नियोजन समित्यांच्या स्थापनेबाबतही बैठकीत चर्चा झाली. या समित्यांवरील नियुक्त्यांसाठी लवकरात लवकर नावे देण्याच्या सूचना घटक पक्षांना करण्यात आल्या आहेत. जिल्हा नियोजन आणि विकास समितीशी (डीपीडीपी) संबंधित कामांनाही गती देण्यात येणार आहे. काही जिल्ह्यांमध्ये यासंदर्भात प्रश्न निर्माण झाले असून, संबंधित नेत्यांशी चर्चा करून त्यावर मार्ग काढला जाईल, असे भुजबळ यांनी सांगितले. राज्यातील दुष्काळी परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या अडचणी हा बैठकीतील आणखी एक महत्त्वाचा विषय होता. मनरेगाच्या माध्यमातून ग्रामीण भागात कामे उपलब्ध करून देणे, जलसंधारणाची कामे हाती घेणे आणि शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी उपाययोजना करण्यावर चर्चा झाली.

तांत्रिक कारणांमुळे काही पात्र शेतकऱ्यांना अग्रीम मदतीची रक्कम मिळाली नसेल, तर संबंधित अडचणी तातडीने दूर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मदत पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी, तसेच या प्रक्रियेत लोकसहभागही महत्त्वाचा असल्याचे भुजबळ यांनी सांगितले.

दादर रेल्वे स्थानकाचे नाव लवकरच 'चैत्यभूमी' होणार! विधिमंडळ अधिवेशनात आवश्यक पूर्तता करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईतील चैत्यभूमी येथे येणाऱ्या अनुयायांसाठी विविध सुविधा, सुरक्षा, वाहतूक, आरोग्य आणि स्वच्छतेच्या व्यवस्थांचे काटेकोर व समन्वित नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. तसेच दादर रेल्वे स्थानकाला 'चैत्यभूमी' हे नाव देण्यास राज्य शासनाने यापूर्वीच तत्वतः मान्यता दिली असून, केंद्र शासनाकडून प्राप्त मार्गदर्शनानुसार विधानमंडळाच्या समितीशी संबंधित आवश्यक प्रक्रियेची पूर्तता विधीमंडळ अधिवेशनात करून नामकरणाची कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथील तयारीचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत बुधवारी आढावा घेण्यात आला. विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात आयोजित बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, गृह राज्यमंत्री योगेश कदम, माजी मंत्री संजय बनसोडे, समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, भाई गिरकर यांच्यासह विविध विभागांचे सचिव, वरिष्ठ पोलीस अधिकारी, रेल्वे, मुंबई महापालिका आणि भारतीय बौद्ध महासभा, अखिल भारतीय बौध्द भिख्खू संघ, आदी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

महापरिनिर्वाण दिनासाठी राज्यासह देशाच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने अनुयायी चैत्यभूमी येथे अभिवादनासाठी येतात. दरवर्षी वाढणारी गर्दी लक्षात घेऊन उपलब्ध सुविधांमध्ये सुधारणा करण्याबरोबरच मागील वर्षांच्या अनुभवातून निदर्शनास आलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. महापरिनिर्वाण दिनाच्या आयोजनात समन्वय समिती, बौद्ध संघटना आणि विविध संस्थांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभत असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शासनाच्या वतीने आवश्यक व्यवस्थांची जबाबदारी पार पाडण्यात येत असली तरी या उपक्रमाच्या प्रभावी आयोजनासाठी सर्व संबंधित घटकांचा समन्वय आवश्यक आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका, पोलीस प्रशासन, जिल्हा प्रशासन, प्रशासकीय विभाग तसेच अन्य संबंधित यंत्रणा नियोजनबद्ध पद्धतीने काम करीत आहेत. यंदाही प्रत्येक विभागाने सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडाव्यात.

इंदू मिल स्मारकासाठी निधी कमी पडू देणार नाही

इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या उर्वरीत कामासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. स्मारकाचे बहुतांश काम पूर्ण झाले असून, मुख्य पुतळ्याचे काम पूर्ण करण्यासंदर्भात काही बाबी प्रलंबित आहेत. कामाच्या खर्चात वाढ झाली तरी त्याची भरपाई करण्यास शासन तयार असून उर्वरित काम गतीने पूर्ण करण्यासाठी पुढील आठवड्यात स्वतंत्र बैठक घेऊन हा विषय मार्गी लावण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

दादर रेल्वे स्थानकाला चैत्यभूमी नाव देण्याच्या मागणीसंदर्भात राज्य सरकारने यापूर्वीच तत्वतः मान्यता देऊन केंद्र सरकारला पत्र पाठवले आहे. मात्र, या प्रक्रियेसाठी विधानमंडळाच्या समितीबाबत केंद्राकडून मार्गदर्शन प्राप्त झाले आहे. त्यामुळे विधिमंडळाच्या अधिवेशनात आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जाईल. त्यानंतर स्थानकाचे नामकरण करण्यात येईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

जानेवारीत राज्यभर ५०० विशेष शिबिरे; मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत निर्णय

ओबीसी कल्याणासाठी ६,८४० कोटींच्या निधीची शिफारस

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यातील ओबीसी आणि १८ पगड जातींच्या कल्याणासाठी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती आणि वसतिगृहांच्या बांधकामासाठी ६,८४० कोटी रुपयांच्या निधीची शिफारस करण्यात येणार आहे. हिवाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमध्ये या निधीचा समावेश करण्याबाबत महसूलमंत्री आणि ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला.



ओबीसी समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी १८ तारखेला मंत्रालयात ही बैठक झाली. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे आणि ओबीसी कल्याणमंत्री अतुल सावे दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

शिष्यवृत्ती आणि महाज्योतीसाठी निधीची मागणी

केंद्र सरकारच्या एनएसपी पोर्टलवरील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी १,८०० कोटी रुपयांची आवश्यकता असताना सध्या केवळ ८३ कोटी रुपयांची तरतूद असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. त्यामुळे हा निधी वाढवण्याची गरज व्यक्त करण्यात आली. तसेच महाज्योतीसाठी ७०० कोटी रुपयांचा निधी, पुण्यातील प्रस्तावित संकुलासाठी जागा आणि प्रलंबित अनुशेष भरून काढण्याबाबतही चर्चा झाली.

जानेवारीत व्हिजेएनटी समाजासाठी विशेष शिबिरे

विमुक्त जाती आणि भटक्या जमातींमधील ४३ जातींच्या नागरिकांना आवश्यक कागदपत्रे मिळवून देण्यासाठी ६, ७ आणि ८ जानेवारी २०२७ रोजी राज्यभरात सुमारे ५०० विशेष शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या शिबिरांच्या माध्यमातून जन्मदाखले आणि आधार कार्ड मिळवून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या मोहिमेसाठी प्रत्येक सर्कलला १० हजार रुपये देण्यात येणार आहेत. ओबीसी योजनांमधून बांधण्यात आलेल्या घरकुलांवर दोन महिन्यांत लाभार्थ्यांच्या नावाचे फलक लावण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

वसतिगृहांचे बांधकाम मार्चपासून सुरु होणार

प्रत्येक जिल्ह्यात १०० क्षमतेची, तर विभागीय स्तरावरील जिल्ह्यांत २५० क्षमतेची मुला-मुलींची वसतिगृहे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एमएसआयडीसीने तयार केलेल्या आराखड्यानुसार मार्चपासून बांधकाम सुरू करण्याचे नियोजन आहे. ही वसतिगृहे पर्यावरणपूरक आणि सौरऊर्जेचा वापर करून उभारण्याच्या सूचना पंकजा मुंडे यांनी दिल्या. ३० डिसेंबरपर्यंत प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून मार्चच्या अर्थसंकल्पात १० नवीन वसतिगृहांसाठी तरतूद करण्याबाबतही त्यांनी सूचना केल्या. गोरेगाव येथील न्यूझीलंड वसतिगृहातील ८० खोल्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाला देण्याबाबत पत्रव्यवहार सुरू असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. पुण्यातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ए-क्लॅमची फाईल अंतिम मान्यतेसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठवण्यात आली आहे. लक्ष्मण हाके यांच्या मागण्याही पूर्ण केल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबवण्यासोबतच ९ टक्के आरक्षणाचा नव्याने अभ्यास करून प्रस्ताव सांख्यिकी विभागाकडे सादर करण्याच्या सूचना छगन भुजबळ यांनी दिल्या.

महायुतीतील नेत्यांवरील टीका सहन करणार नाही

बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना बावनकुळे यांनी महायुतीतील समन्वयाबाबतही भूमिका स्पष्ट केली. महायुतीच्या समन्वय समितीच्या बैठकीत तिन्ही पक्षांनी मित्रपक्षांच्या नेत्यांवर जाहीर टीका करू नये, असा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यावर

(पान २ वर...)

दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादकीय....

चैत्यभूमी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईतील चैत्यभूमी येथे येणाऱ्या अनुयायांसाठी विविध सुविधा, सुरक्षा, वाहतूक, आरोग्य आणि स्वच्छतेच्या व्यवस्थांचे काटेकोर व समन्वित नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी नुकतेच दिले. तसेच दादर रेल्वे स्थानकाला 'चैत्यभूमी' हे नाव देण्यास राज्य शासनाने यापूर्वीच तत्वतः मान्यता दिली असून, केंद्र शासनाकडून प्राप्त मार्गदर्शनानुसार विधानमंडळाच्या समितीशी संबंधित आवश्यक प्रक्रियेची पूर्तता विधीमंडळ अधिवेशनात करून नामकरणाची कार्यवाही करण्यात येणार आहे. महापरिनिर्वाण दिनासाठी राज्यासह देशाच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने अनुयायी चैत्यभूमी येथे अभिवादनासाठी येतात. दरवर्षी वाढणारी गर्दी लक्षात घेऊन उपलब्ध सुविधांमध्ये सुधारणा करण्याबरोबरच मागील वर्षांच्या अनुभवातून निदर्शनास आलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. महापरिनिर्वाण दिनाच्या आयोजनात समन्वय समिती, बौद्ध संघटना आणि विविध संस्थांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभत आहे. शासनाच्या वतीने आवश्यक व्यवस्थांची जबाबदारी पार पाडण्यात येत असली तरी या उपक्रमाच्या प्रभावी आयोजनासाठी सर्व संबंधित घटकांचा समन्वय आवश्यक आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका, पोलीस प्रशासन, जिल्हा प्रशासन, प्रशासकीय विभाग तसेच अन्य संबंधित यंत्रणा नियोजनबद्ध पद्धतीने काम करीत आहेत.

राष्ट्रीय एकात्मता : राष्ट्राच्या सामर्थ्याचा आणि प्रगतीचा आधार

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

भारत हा विविधतेने नटलेला आणि सांस्कृतिक समृद्धीचा वारसा लाभलेला देश आहे. अनेक भाषा, धर्म, जाती, पंथ, संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती यांचे सहअस्तित्व हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. देशाच्या एका भागातील भाषा, वेशभूषा, खाद्यसंस्कृती आणि परंपरा दुसऱ्या भागापेक्षा वेगळ्या असल्या, तरी या सर्वांना जोडणारा समान धागा म्हणजे भारतीयत्वाची भावना होय. ही भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात देशाविषयी आपलेपणा, परस्परांविषयी आदर, सामाजिक बांधिलकी आणि सामूहिक जबाबदारी निर्माण करते. विविधतेचा स्वीकार करून एकतेची भावना जपणे, प्रत्येक नागरिकाच्या प्रतिष्ठेचा सन्मान करणे आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रित प्रयत्न करणे म्हणजे राष्ट्रीय एकात्मता होय. राष्ट्रीय एकात्मता ही केवळ राजकीय किंवा भौगोलिक संकल्पना नसून ती सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक आणि वैचारिक पातळीवर विकसित होणारी व्यापक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी १९ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय एकात्मता दिन साजरा केला जातो.

राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करताना विविधतेतील एकतेची संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे देशातील सर्व नागरिकांनी आपापली स्वतंत्र ओळख विसरून एकसारखे जीवन जगणे नव्हे. प्रत्येकाला आपली भाषा, धर्म, संस्कृती आणि परंपरा जपण्याचे स्वातंत्र्य असतानाच इतरांच्या वेगळेपणाचा आदर करण्याची मानसिकता विकसित होणे म्हणजे खरी राष्ट्रीय एकात्मता होय. विविधतेचे अस्तित्व मान्य करून त्यातून परस्पर विश्वास, सहकार्य, बंधुभाव आणि समान राष्ट्रीय जाणीव निर्माण करणे हे तिचे वैशिष्ट्य आहे. देशाच्या कोणत्याही भागातील नागरिकाला इतर प्रदेशातील नागरिक परका वाटू नये, तर सर्वजण एका व्यापक राष्ट्रीय कुटुंबाचे घटक आहेत, अशी भावना निर्माण झाली पाहिजे. ही भावना केवळ राष्ट्रीय सणांच्या दिवशी व्यक्त होऊन चालणार नाही, तर दैनंदिन सामाजिक व्यवहारातही तिचे प्रतिबिंब दिसले पाहिजे.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासामध्ये राष्ट्रीय एकात्मतेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी देशातील विविध जाती, धर्म, भाषा आणि प्रदेशांतील नागरिक एकत्र आले होते. त्यांची सामाजिक पार्श्वभूमी आणि जीवनपद्धती वेगवेगळी असली, तरी परकीय सत्तेपासून मुक्त होऊन स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याचे ध्येय समान होते. स्वातंत्र्यलढ्याने भारतीय समाजाला त्याग, सहकार्य, सामूहिक संघर्ष आणि देशप्रेमाची शिकवण दिली. या संघर्षामध्ये विविध समाजघटकांनी दिलेले योगदान भारतीय राष्ट्रीयत्वाच्या जडणघडणीसाठी महत्त्वपूर्ण ठरले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशासमोर राष्ट्रीय अखंडता टिकविणे, लोकशाही व्यवस्था मजबूत करणे, सामाजिक विषमता दूर करणे आणि सर्वसमावेशक विकास साधणे ही आव्हाने होती. या सर्व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेची भावना अत्यावश्यक ठरली.

भारतीय संविधान हा राष्ट्रीय एकात्मतेचा सर्वांत महत्त्वाचा आधार आहे. संविधानाच्या उद्देशिकेमध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांना विशेष स्थान देण्यात आले आहे. ही मूल्ये भारतीय लोकशाहीच्या पायाभूत तत्त्वांबरोबरच राष्ट्रीय एकात्मतेची दिशादर्शक तत्त्वे आहेत. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्यायामुळे प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याची संधी मिळते. विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा, धर्म आणि उपासना यांचे स्वातंत्र्य व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे रक्षण करते. कायद्यापुढील समानता नागरिकांमधील भेदभावाला प्रतिबंध करते, तर बंधुतेची भावना व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता व अखंडता टिकविण्यास मदत करते. त्यामुळे संविधानाचे पालन करणे, संविधानिक संस्थांचा आदर करणे आणि लोकशाही मूल्यांचे आचरण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. संविधानातील मूल्ये केवळ शासकीय व्यवस्था किंवा न्यायालयीन प्रक्रियेपुरती मर्यादित न राहता ती समाजाच्या सामूहिक जीवनात रुजली पाहिजेत.

राष्ट्रीय एकात्मतेच्या जडणघडणीत सामाजिक समतेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय समाजामध्ये जातीय भेदभाव, अस्पृश्यता, सामाजिक उच्चनीचता आणि आर्थिक विषमता यांसारख्या समस्या ऐतिहासिकदृष्ट्या अस्तित्वात राहिल्या आहेत. या विषमतेमुळे समाजातील अनेक घटकांना शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या संधींपासून वंचित राहावे लागले. अशा परिस्थितीत केवळ एकतेच्या घोषणा देऊन सामाजिक एकात्मता साध्य होऊ शकत नाही. प्रत्येक व्यक्तीला समान सन्मान, समान संधी आणि न्याय्य वागणूक मिळणे आवश्यक आहे. जात, धर्म, लिंग, भाषा, प्रदेश किंवा आर्थिक परिस्थिती यांच्या आधारावर कोणताही भेदभाव होता कामा नये. सामाजिक न्यायाची प्रभावी अंमलबजावणी, वंचित घटकांचे सक्षमीकरण आणि दुर्बल समूहांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेणे यांमधून राष्ट्रीय एकात्मतेचा पाया मजबूत होतो. समाजातील प्रत्येक घटकाला प्रतिष्ठेने जगण्याची संधी मिळणे ही सशक्त राष्ट्रनिर्मितीची पूर्वअट आहे.

धार्मिक विविधता ही भारतीय समाजाची महत्त्वपूर्ण ओळख आहे. भारतामध्ये विविध धर्मांचे, पंथांचे आणि श्रद्धापरंपरांचे नागरिक एकत्रितपणे राहतात. प्रत्येक धर्माची स्वतंत्र उपासना पद्धती, तत्त्वज्ञान, सांस्कृतिक परंपरा आणि जीवनविषयक दृष्टिकोन आहे. या विविधतेमुळे भारतीय संस्कृती अधिक समृद्ध झाली आहे. मात्र, धर्माच्या नावावर द्वेष, असहिष्णुता, पूर्वग्रह आणि संघर्ष निर्माण होणे हे राष्ट्रीय एकात्मतेसमोरील गंभीर आव्हान आहे. कोणत्याही धर्माचा अवमान न करता प्रत्येकाच्या श्रद्धेचा आदर करणे ही सुसंस्कृत समाजाची मूलभूत अपेक्षा आहे. धार्मिक श्रद्धा ही व्यक्तीच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग असली, तरी सार्वजनिक जीवनामध्ये मानवी मूल्ये, परस्पर सन्मान आणि सामाजिक सलोखा यांना प्राधान्य मिळाले पाहिजे. विविध धर्मांच्या नागरिकांमध्ये संवाद वाढविणे, सामूहिक सामाजिक उपक्रम राबविणे आणि एकमेकांच्या सण-उत्सवांमध्ये सहभागी होणे यांमुळे परस्पर विश्वास दृढ होतो. धार्मिक सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव यांमुळे राष्ट्रीय एकात्मतेला स्थैर्य प्राप्त होते.

भाषिक विविधता ही भारताच्या सांस्कृतिक वैभवाचा आणखी एक महत्त्वपूर्ण भाग आहे. देशातील विविध राज्यांमध्ये अनेक भाषा आणि बोली बोलल्या जातात. प्रत्येक भाषेमध्ये त्या प्रदेशाचा इतिहास, लोकजीवन, साहित्य, ज्ञानपरंपरा आणि सांस्कृतिक अनुभव सामावलेले आहेत. मराठी, हिंदी, बंगाली, तमिळ, तेलुगू, कन्नड, मल्याळम, गुजराती, पंजाबी, आसामी आणि इतर अनेक भाषांनी भारतीय साहित्य व संस्कृती समृद्ध केली आहे. कोणतीही भाषा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नसून प्रत्येक भाषेला तिचे स्वतंत्र महत्त्व आहे. मातृभाषेचा अभिमान बाळगणे स्वाभाविक असले, तरी इतर भाषांचा अवमान करणे योग्य नाही. भाषेच्या आधारावर प्रादेशिक श्रेष्ठत्वाची भावना निर्माण होऊ नये. विविध भारतीय भाषांमधील साहित्याचे अनुवाद, भाषिक शिक्षण, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि आंतरराज्यीय संवाद यांमुळे परस्पर समज वाढते. भाषा ही माणसांना जोडणारी शक्ती ठरली पाहिजे, विभागणी करणारे साधन नव्हे.

राष्ट्रीय एकात्मता टिकविण्यासाठी प्रादेशिक समतोल आणि सर्वसमावेशक विकासालाही विशेष महत्त्व आहे. भारतातील विविध राज्ये आणि प्रदेश नैसर्गिक साधनसंपत्ती, भौगोलिक परिस्थिती, औद्योगिक विकास, शेती, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी या बाबतीत वेगवेगळ्या स्थितीत आहेत. काही प्रदेशांमध्ये वेगाने विकास होत असताना काही भागांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव जाणवतो. ग्रामीण, आदिवासी, दुर्गम, डोंगराळ आणि सीमावर्ती भागांतील नागरिकांना शिक्षण, आरोग्य, वाहतूक, पिण्याचे पाणी आणि रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध होत नाहीत. विकासातील ही विषमता दूर करण्यासाठी सर्व प्रदेशांना समान महत्त्व देणे आवश्यक आहे. स्थानिक गरजांनुसार विकासाचे नियोजन, पायाभूत सुविधांची उभारणी, रोजगारनिर्मिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि आरोग्यसेवांचा विस्तार यांमधून प्रादेशिक असमतोल कमी करता येतो. एखाद्या प्रदेशाचा विकास म्हणजे संपूर्ण देशाचा विकास, ही जाणीव प्रत्येक नागरिकामध्ये निर्माण झाली पाहिजे.

शिक्षण हे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये विवेकशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन, सामाजिक जाणीव, सहिष्णुता आणि लोकशाही मूल्यांची रुजवण होते. शाळा आणि महाविद्यालये ही केवळ ज्ञानप्राप्तीची केंद्रे नसून सामाजिक समरसता आणि जबाबदार नागरिकत्व घडविण्याची महत्त्वपूर्ण ठिकाणे आहेत. विविध जाती, धर्म, भाषा आणि आर्थिक स्तरांतील विद्यार्थी एकत्र शिकतात, खेळतात आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होतात. या प्रक्रियेत त्यांच्यामध्ये परस्पर सहकार्य, मैत्री आणि समानतेची भावना विकसित होते. अभ्यासक्रमामध्ये भारतीय स्वातंत्र्यलढा, संविधानिक मूल्ये, सामाजिक सुधारणा, विविध भारतीय संस्कृती, लोकशाही आणि मानवी हक्क यांचा समावेश असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना केवळ परीक्षाभिमुख ज्ञान न देता जबाबदार नागरिकत्वाची जाणीव करून दिली पाहिजे. राष्ट्रीय सण, संविधान दिन, सांस्कृतिक कार्यक्रम आणि आंतरराज्यीय विद्यार्थी देवाणघेवाण यांच्या माध्यमातून एकात्मतेची भावना अधिक दृढ करता येते.

आजच्या काळात युवकांची भूमिका राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. भारत हा तरुण लोकसंख्येचा देश असल्यामुळे देशाच्या वर्तमान आणि भविष्याची दिशा ठरविण्यात युवकांचा मोठा वाटा आहे. युवकांमध्ये ऊर्जा, कल्पकता, तंत्रज्ञानाची जाण आणि परिवर्तनाची क्षमता आहे. या क्षमतेचा उपयोग समाजातील भेदभाव दूर करण्यासाठी, सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी आणि विकासात्मक उपक्रमांना गती देण्यासाठी झाला पाहिजे. युवकांनी जातीय आणि धार्मिक पूर्वग्रहांपासून दूर राहून विवेकपूर्ण विचार स्वीकारणे आवश्यक आहे. समाजमाध्यमांवरील अपप्रचार, द्वेषपूर्ण संदेश आणि अफवांना बळी न पडता माहितीची सत्यता तपासण्याची सवय त्यांनी विकसित केली पाहिजे. रक्तदान, पर्यावरण संवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, स्वच्छता, ग्रामविकास आणि सामाजिक जनजागृती यांसारख्या उपक्रमांमध्ये युवकांचा सहभाग वाढल्यास समाजातील एकोपा अधिक दृढ होऊ शकतो. युवकांनी आपल्या वैयक्तिक प्रगतीबरोबरच समाजाच्या सामूहिक प्रगतीचाही विचार केला पाहिजे.

महिलांचा सहभाग आणि सक्षमीकरण हेदेखील राष्ट्रीय एकात्मतेचे महत्त्वाचे परिमाण आहे. भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय विकासात महिलांचे योगदान मोठे आहे. तथापि, आजही अनेक महिलांना लिंगभेद, हिंसाचार, असुरक्षितता, आर्थिक परावलंबित्व आणि सामाजिक बंधनांचा सामना करावा लागतो. महिलांना समान शिक्षण, रोजगार, निर्णयप्रक्रियेतील सहभाग आणि सुरक्षित सामाजिक वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. ग्रामीण आणि आदिवासी महिलांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे, महिला बचत गटांना प्रोत्साहन देणे, नेतृत्वक्षमता विकसित करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील त्यांचा सहभाग वाढविणे या बाबी महत्त्वपूर्ण आहेत. समाजातील निम्म्या लोकसंख्येला समान प्रतिष्ठा आणि संधी नाकारून राष्ट्रीय एकात्मतेची कल्पना पूर्ण होऊ शकत नाही. महिला सक्षमीकरणामुळे कुटुंब, समाज आणि राष्ट्र या तिन्ही स्तरांवर सकारात्मक परिवर्तन घडते.

ग्रामीण आणि आदिवासी समाजाचा राष्ट्रीय एकात्मतेतील सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. भारताच्या ग्रामीण जीवनामध्ये शेती, पशुपालन, ग्रामोद्योग, लोककला आणि पारंपरिक ज्ञानव्यवस्थांचा मोठा वाटा आहे. आदिवासी समाजाने आपल्या वैशिष्ट्यपूर्ण भाषा, नृत्य, संगीत, लोकपरंपरा, निसर्गाशी असलेले नाते आणि सामुदायिक जीवनपद्धती यांद्वारे भारतीय संस्कृतीला समृद्ध केले आहे. मात्र, विकासाच्या प्रक्रियेत या समाजांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांकडे दुर्लक्ष होता कामा नये. त्यांच्या जमिनी, जंगल, जलस्रोत, पारंपरिक उपजीविका आणि सांस्कृतिक अधिकारांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाला केवळ विकास योजनांचा लाभार्थी न मानता विकास प्रक्रियेतील सक्रिय भागीदार म्हणून स्थान दिले पाहिजे. त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचा सन्मान, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सहभाग आणि शिक्षण व रोजगाराच्या संधींचा विस्तार यांमधून राष्ट्रीय एकात्मता अधिक व्यापक आणि समावेशक बनू शकते.

राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आधुनिक आव्हानांमध्ये जातीयवाद, धार्मिक कट्टरता, भाषिक संघर्ष, प्रादेशिक अस्मिता, आर्थिक विषमता आणि राजकीय ध्रुवीकरण यांचा समावेश होतो. लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीला आपले मत मांडण्याचा आणि राजकीय विचारधारा स्वीकारण्याचा अधिकार आहे. मात्र, मतभिन्नतेचे रूपांतर वैयक्तिक द्वेषात किंवा सामाजिक संघर्षात होता कामा नये. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सार्वजनिक जीवनातील नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींनी समाजामध्ये बंधुभाव आणि संवादाचे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी पार पाडली पाहिजे. निवडणुकीच्या राजकारणात जात, धर्म आणि भाषेच्या आधारावर समाजाचे विभाजन करण्याचे प्रयत्न लोकशाहीच्या मूलभूत भावनेला बाधा पोहोचवतात. राजकीय मतभेद असले तरी राष्ट्रीय हित, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक सलोखा यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. मतभिन्नता ही लोकशाहीची ताकद आहे; परंतु परस्परांचा द्वेष करणे ही तिची कमजोरी आहे, याचे भान समाजाने ठेवले पाहिजे.

समाजमाध्यमे आणि माहिती तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे राष्ट्रीय एकात्मतेच्या संकल्पनेला नवीन परिमाण प्राप्त झाले आहे. आज माहितीचा प्रसार अत्यंत वेगाने होतो. देशातील एका भागात घडलेली घटना काही क्षणांत संपूर्ण देशापर्यंत पोहोचते. यामुळे विविध प्रदेशांतील लोकांना एकमेकांच्या समस्या, संस्कृती आणि सामाजिक परिस्थिती समजून घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. मात्र, याच माध्यमांचा गैरवापर करून खोट्या बातम्या, अफवा, धार्मिक तेढ निर्माण करणारे संदेश आणि द्वेषपूर्ण मजकूर पसरविला जातो. अशा माहितीमुळे समाजात गैरसमज, अविश्वास आणि संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे डिजिटल साक्षरता आणि माध्यम साक्षरता ही काळाची गरज बनली आहे. कोणतीही माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, विश्वासार्ह स्रोतांचा आधार घेणे आणि जबाबदारीने अभिव्यक्ती करणे आवश्यक आहे. समाजमाध्यमांचा उपयोग विविध संस्कृतींची ओळख करून देण्यासाठी, राष्ट्रीय प्रश्नांवर विधायक चर्चा घडविण्यासाठी आणि सामाजिक सहकार्य वाढविण्यासाठी केला पाहिजे.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी आर्थिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासदेखील तितकाच आवश्यक आहे. बेरोजगारी, गरिबी, महागाई, कुपोषण आणि शिक्षणातील असमानता या समस्या समाजामध्ये असंतोष निर्माण करू शकतात. आर्थिक संधींचे केंद्रीकरण झाल्यास समाजातील विविध घटकांमध्ये दरी वाढते. त्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागांतील आर्थिक अंतर कमी करणे, लघुउद्योगांना प्रोत्साहन देणे, कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आणि तरुणांसाठी रोजगारनिर्मिती करणे गरजेचे आहे. शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न, असंघटित क्षेत्रातील कामगारांची सुरक्षितता, स्थलांतरित मजुरांचे प्रश्न आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे सक्षमीकरण यांना राष्ट्रीय विकासाच्या केंद्रस्थानी स्थान मिळाले पाहिजे. समाजातील प्रत्येक घटकाला राष्ट्राच्या प्रगतीमध्ये योगदान देण्याची संधी मिळाल्यास नागरिकांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण होते. विकासाचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचविणे हेच राष्ट्रीय एकात्मतेचे व्यावहारिक स्वरूप आहे.

राष्ट्रीय एकात्मतेमध्ये कला, साहित्य, संगीत, क्रीडा आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचे योगदानही महत्त्वपूर्ण आहे. भारतातील लोककला, लोकनृत्य, लोकसंगीत, नाट्यपरंपरा आणि साहित्य यांमधून विविध समाजघटकांच्या जीवनाचे दर्शन घडते. महाराष्ट्रातील लावणी, पोवाडा, भारूड आणि आदिवासी नृत्यपरंपरा जशा सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक आहेत, तसेच देशातील इतर प्रदेशांतील कला आणि परंपराही राष्ट्रीय संस्कृतीला समृद्ध करतात. साहित्यिक आणि सांस्कृतिक महोत्सव, राष्ट्रीय स्तरावरील कला स्पर्धा, युवक महोत्सव आणि आंतरराज्यीय सांस्कृतिक कार्यक्रम यांमधून विविधतेतील एकतेचा अनुभव घेता येतो. क्रीडा क्षेत्रामध्ये भाषिक, धार्मिक आणि प्रादेशिक भेद बाजूला ठेवून खेळाडू देशाचे प्रतिनिधित्व करतात. भारतीय संघाच्या विजयात प्रत्येक नागरिकाला आनंद होतो, कारण त्या क्षणी वैयक्तिक आणि प्रादेशिक ओळखींपेक्षा राष्ट्रीय ओळख अधिक महत्त्वाची ठरते. अशा अनुभवांमुळे सामूहिक अभिमान आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ होते.

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेमध्येही राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये खोलवर रुजलेली आहेत. संतपरंपरेने समता, मानवता, बंधुभाव आणि सामाजिक सलोख्याचा संदेश दिला. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्यातून समता, शिक्षण, न्याय आणि मानवी प्रतिष्ठेचे महत्त्व अधोरेखित झाले. महाराष्ट्रातील विविध जाती, धर्म, भाषा आणि सांस्कृतिक समूहांनी एकत्रितपणे सामाजिक जीवन समृद्ध केले आहे. राज्याच्या ग्रामीण भागापासून महानगरांपर्यंत विविध प्रदेशांतील लोक रोजगार, शिक्षण आणि व्यवसायाच्या निमित्ताने एकत्र राहतात. या सहअस्तित्वाला परस्पर आदर, सामाजिक सहकार्य आणि समान संधींची जोड मिळणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनाची परंपरा राष्ट्रीय एकात्मतेच्या व्यापक ध्येयाला प्रेरणा देणारी आहे.



राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करताना पर्यावरण संवर्धन आणि सामूहिक जबाबदारी यांचाही विचार करणे आवश्यक आहे. जलसंकट, हवामान बदल, जंगलतोड, प्रदूषण आणि नैसर्गिक आपत्ती या समस्या कोणत्याही एका जातीच्या, धर्माच्या किंवा प्रदेशाच्या मर्यादेत राहिलेल्या नाहीत. त्यांचा परिणाम संपूर्ण समाजावर होतो. त्यामुळे पर्यावरण संरक्षणासाठी सर्व नागरिकांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. पाणी बचत, वृक्षारोपण, जैवविविधतेचे संरक्षण, स्वच्छता आणि शाश्वत विकास यांसारख्या उपक्रमांमध्ये सामूहिक सहभाग वाढविला पाहिजे. निसर्गाने निर्माण केलेल्या साधनसंपत्तीचा वापर जबाबदारीने करणे ही वर्तमान पिढीची भावी पिढ्यांप्रती असलेली नैतिक जबाबदारी आहे. पर्यावरणीय प्रश्नांवर एकत्रित कृती करण्याची भावना राष्ट्रीय एकात्मतेला अधिक व्यापक सामाजिक संदर्भ प्राप्त करून देते.

राष्ट्रीय एकात्मता दिनाच्या निमित्ताने केवळ कार्यक्रमांचे आयोजन करून किंवा एकात्मतेच्या घोषणा देऊन आपली जबाबदारी संपत नाही. राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये दैनंदिन जीवनात रुजविणे अधिक महत्त्वाचे आहे. कुटुंबामध्ये मुलांना जातीय आणि धार्मिक भेदभावापासून दूर राहण्याची शिकवण देणे, शाळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देणे, सार्वजनिक ठिकाणी इतरांच्या अधिकारांचा आदर करणे आणि सामाजिक प्रश्नांवर संवेदनशीलतेने विचार करणे या कृतींमधून एकात्मतेचा पाया मजबूत होतो. स्थानिक स्वराज्य संस्थांनी विविध समाजघटकांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेतले पाहिजे. स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे, महिला संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सामाजिक सलोखा वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत. नैसर्गिक आपत्ती किंवा इतर संकटांच्या काळात नागरिकांनी एकमेकांना मदत करण्याची भावना जपली पाहिजे. संकटाच्या वेळी माणुसकीला धर्म, जात आणि प्रदेशाची मर्यादा नसते, हे अनेक अनुभवांनी सिद्ध केले आहे.

राष्ट्रीय एकात्मता ही स्थिर किंवा एकदाच साध्य होणारी गोष्ट नसून ती सातत्याने जपावी आणि विकसित करावी लागणारी सामाजिक प्रक्रिया आहे. काळानुसार समाजाच्या गरजा, आव्हाने आणि जीवनपद्धती बदलत असतात. त्यामुळे राष्ट्रीय एकात्मतेची मूल्येही नव्या परिस्थितीशी जोडून अधिक प्रभावीपणे रुजविण्याची आवश्यकता आहे. आधुनिक भारताला विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग, कृषी, आरोग्य आणि जागतिक व्यापार अशा विविध क्षेत्रांमध्ये प्रगती करायची आहे. ही प्रगती साधण्यासाठी देशातील नागरिकांमध्ये विश्वास, सहकार्य आणि सामूहिक जबाबदारीची भावना असणे आवश्यक आहे. सामाजिक संघर्ष आणि परस्पर द्वेषामध्ये समाजाची ऊर्जा खर्च होण्याऐवजी ती राष्ट्रनिर्मितीसाठी वापरली गेली पाहिजे. प्रत्येक नागरिकाने आपल्या अधिकारांबरोबरच कर्तव्यांची जाणीव ठेवली, तर लोकशाही अधिक सक्षम होईल आणि राष्ट्रीय एकात्मतेचा पाया अधिक मजबूत बनेल.

१९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा राष्ट्रीय एकात्मता दिन हा भारतीय समाजाला विविधतेतील एकतेची जाणीव करून देणारा महत्त्वपूर्ण दिवस आहे. या दिवसाचा खरा संदेश केवळ राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यापुरता मर्यादित न राहता तो आपल्या विचारांत, वर्तनात आणि सामाजिक व्यवहारात प्रतिबिंबित झाला पाहिजे. कोणत्याही व्यक्तीची ओळख तिच्या जाती, धर्म, भाषा किंवा प्रदेशावरून ठरविण्याऐवजी तिच्या माणूसपणाला आणि कर्तृत्वाला महत्त्व दिले पाहिजे. देशातील प्रत्येक नागरिकाला समान सन्मान, सुरक्षितता, न्याय आणि विकासाची संधी मिळणे हीच सशक्त राष्ट्राची खरी ओळख आहे. आपापल्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे जतन करताना परस्परांच्या अस्तित्वाचा आदर करणे, मतभिन्नतेतून संवाद साधणे आणि सामूहिक हिताला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. राष्ट्रीय एकात्मता ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक भारतीयाची सामूहिक बांधिलकी आहे. विविधतेचा स्वीकार, सामाजिक समता, धार्मिक सहिष्णुता, भाषिक आदर, बंधुभाव आणि संविधाननिष्ठा या मूल्यांच्या आधारावरच विकसित, शांततापूर्ण आणि समृद्ध भारताची निर्मिती होऊ शकते. म्हणूनच 'विविधता ही आपली शक्ती आणि एकात्मता ही आपली ओळख' हा विचार प्रत्येक भारतीयाच्या मनात रुजला पाहिजे. राष्ट्रीय एकात्मतेच्या बळावरच भारताची लोकशाही अधिक सुदृढ होईल आणि भावी पिढ्यांसाठी न्याय्य, समताधिष्ठित, सुरक्षित व प्रगत राष्ट्र निर्माण करण्याचे स्वप्न साकार होईल.

– डॉ. राजेंद्र बगाटे,

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

सामान्य कार्यकर्त्याला संधी देणे ही केवळ उमेदवारी नसून तळागाळातील कार्यकर्त्याच्या कष्टांचा आणि निष्ठेचा सन्मान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

साफळे सारख्या एक छोट्याशा गावातील धनगर समाजातील निष्ठावंत कार्यकर्त्याला सोलापूर जिल्ह्या बँकेत संचालक बनवणारा नेता... सचिनदादांची कार्यकर्त्यांना ताकद...!

पक्षातील कार्यकर्ते आणि नेते फक्त सतरंज्या उचलण्यासाठीच आहेत का? असा सवाल करणाऱ्यांनी एकदा अक्कलकोटच्या राजकारणाकडेही डोळसपणे पाहण्याची गरज आहे.

कारण अक्कलकोटमध्ये एका छोट्याशा गावातील सामान्य कुटुंबातून आलेल्या,तळागाळात काम करणाऱ्या कार्यकर्त्याला थेट जिल्हा बँकेच्या संचालकपदासाठी उमेदवारी देण्याचे धाडस आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी दाखवले आहे.राजकुमार बंदीछोडे यांच्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला संधी देणे ही केवळ उमेदवारी नसून तळागाळातील कार्यकर्त्याच्या कष्टांचा आणि निष्ठेचा सन्मान आहे. पंचायत समिती निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता तरी त्यांचा पडत्या राजकीय कार्यकाळाला बळ देण्यासाठी पुन्हा जिल्हा बँकेत संधी देणारे दादा...

ज्या ठिकाणी राजकीय वजन असलेले आमदार आणि मोठे नेते स्वतः उमेदवारी दाखल करत आहेत,त्याच राजकीय पटावर एका सामान्य कार्यकर्त्याला पुढे आणण्याची भूमिका महत्त्वाची ठरते. मग सामान्य कार्यकर्त्याला नेतृत्वाची संधी मिळत नाही,असा आरोप करणाऱ्यांनी या निर्णयाकडे



दुर्लक्ष कसे करायचे?

खरा नेता तोच असतो,जो केवळ स्वतःभोवती पदे आणि सत्ता केंद्रित करत नाही,तर आपल्या कार्यकर्त्यांनाही मोठे होण्याची संधी देतो.कार्यकर्त्याला केवळ घोषणा देण्यासाठी किंवा सतरंज्या उचलण्यासाठी न ठेवता त्याला निर्णयप्रक्रियेत स्थान देतो. सचिनदादांच्या या भूमिकेतून नेम का हाच संदेश जातो...

राजकारणात टीका करणे सोपे असते पण सामान्य कार्यकर्त्याला मोठे करण्यासाठी त्याच्या पाठीशी उभे राहण्याची हिंमत लागते...!

राजकुमार बंदीछोडे यांना दिलेली उमेदवारी ही केवळ एका व्यक्तीची संधी नाही,तर गावागावांत काम करणाऱ्या असंख्य सामान्य कार्यकर्त्यांसाठी आशेचा संदेश आहे.

अक्कलक

कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडून विविध ठिकाणांची पाहणी

स्वच्छता, पाणीपुरवठा, भाविकांच्या सुविधा व वाहतूक व्यवस्थेला प्राधान्य देण्याच्या सूचना

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभूमीवर भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आज वाखरी पालखी तळ, सरगम चौक, चंद्रभागा वाळवंट व भक्तीसागर परिसराची पाहणी करून संबंधित विभागांकडून तयारीचा आढावा घेतला. यात्रा कालावधीत भाविकांची गैरसोय होणार नाही, यासाठी स्वच्छता, पाणीपुरवठा, वाहतूक आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

कार्तिकी शुद्ध एकादशी २१ नोव्हेंबर रोजी असून, यात्रा कालावधी १० ते २४ नोव्हेंबर असा आहे. या काळात राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने वारकरी व भाविक पंढरपुरात दाखल होतात. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी





प्रत्यक्ष स्थळपाहणी करून व्यवस्थेची माहिती घेतली.

चंद्रभागा नदीपात्र व घाट परिसरात स्वच्छता कायम राखण्यासाठी अतिरिक्त स्वच्छता कर्मचारी नियुक्त करावेत. नदीकाठावरील काटेरी झाडे-झुडपे काढावीत, घाटांवरील माती हटवून घाट स्वच्छ धुऊन घ्यावेत. घाटांच्या कोपऱ्यांमध्ये साचलेला कचरा तातडीने हटवावा. नदीपात्रात वाहनांचा प्रवेश रोखण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. वाळवंटात खाद्यपदार्थ व माळा विक्री करणाऱ्या व्यावसायिकांमुळे अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घेण्यासही त्यांनी सांगितले.

भक्तीसागर परिसरात दिंड्यांसोबत येणारे वारकरी व भाविक मोठ्या संख्येने वास्तव्यास असतात. त्यांच्या सोयीसाठी नदीपात्रात जाण्या-येण्यासाठी तयार करण्यात आलेल्या तात्पुरत्या घाटाचे मुरुमीकरण व सपाटीकरण तातडीने पूर्ण करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

वाखरी पालखी तळावर कार्तिकी यात्रेनिमित्त मोठ्या प्रमाणात जनावरांचा बाजार भरतो. या ठिकाणी जनावरे व पशुपालकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. जनावरांच्या उपचारासाठी २४ तास पशुवैद्यकीय पथक कार्यरत ठेवावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

सरगम चौक येथे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे काम सुरू असल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महामार्ग प्राधिकरणाने आवश्यक उपाययोजना करून वाहतूक सुरळीत राहील, याची दक्षता घ्यावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी नगराध्यक्षा प्रणिती भालके यांनी चंद्रभागा वाळवंटात महिलांसाठी चेंजिंग रूमची संख्या वाढविणे तसेच परिसरात वेळोवेळी जंतुनाशक फवारणी करण्याची सूचना केली.

या पाहणीवेळी नगराध्यक्षा प्रणिती भालके, प्रांताधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी सीताराम डुबल, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी आदी उपस्थित होते.

सैनिक टाकळीत भीषण ऊस आग; ४० ते ५० एकर ऊस जळून खाक

माळी वसाहत, दानवाड भाग ते कांबळे मळ्यापर्यंत आगीचा भडका; शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान



सैनिक टाकळी/संजय चव्हाण : येथील परिसरात ऊसाच्या शेतांना अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली असून, या आगीत तब्बल ४० ते ५० एकर क्षेत्रातील ऊस जळून खाक झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. माळी वसाहत, दानवाड भागापासून कांबळे मळ्यापर्यंतच्या परिसरातील ऊस आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे.

अचानक लागलेल्या या आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले. आगीच्या ज्वाळांनी ऊसशेतीला वेढा घातल्याने मोठ्या प्रमाणात ऊस जळून खाक झाला. या आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

आधीच दुष्काळाचे सावट, पाण्याची टंचाई आणि शेतीसाठी वाढता खर्च अशा अनेक संकटांचा सामना शेतकरी करत आहेत. मोठ्या कष्टाने आणि मेहनतीने उभे केलेले ऊसपीक डोळ्यांसमोर जळून खाक झाल्याने शेतकऱ्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. वर्षभर केलेली मेहनत आणि पिकासाठी केलेला खर्च आगीमुळे वाया गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.


निसर्गाच्या लहरीपणामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना आता आगीच्या संकटालाही सामोरे जावे लागत आहे. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

शासनाने या घटनेची तातडीने दखल घेऊन नुकसानीचे पंचनामे करावेत आणि बाधित शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

दिवाळीनिमित्त बंगळुरूमध्ये 'डॉग्ज ऑफ बंगळुरू' मोहिमेचा शुभारंभ

HIREMATH FOUNDATION

BDRC Banglore Distemper Rehabilitation Centre



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

भटक्या श्वानांच्या सुरक्षिततेसाठी हिरेमठ फाउंडेशन, बंगळुरू डिस्टेंपर पुनर्वसन केंद्र आणि उणझ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत QR कोड कॉलरचे वाटप

बंगळुरू: दिवाळीच्या काळात फटाक्यांच्या मोठ्या आवाजामुळे घाबरून अनेक भटके आणि पाळीव श्वान रस्ता चुकतात आणि हरवतात. अशा श्वानांची सुरक्षितपणे ओळख पटवून त्यांना त्यांच्या मालकांपर्यंत किंवा काळजीवाहकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने बंगळुरूमध्ये 'डॉग्ज ऑफ बंगळुरू' (Dogs of Bangalore - dogsofbangalore.com) हे डिजिटल व्यासपीठ सुरू करण्यात आले आहे.

शेजारी काळजी घेतात, एक शहर - अनेक प्रेमळ श्वान (Neighbours look out. One city, many good dogs) या संदेशासह बंगळुरू डिस्टेंपर पुनर्वसन केंद्राच्या संस्थापिका गरिमा सोळंकी यांच्या नेतृत्वाखाली या मोहिमेची सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमासाठी हिरेमठ फाउंडेशन आणि उणझ या संस्थांनी मोफत ठठ कोड कॉलर उपलब्ध करून देत हातभार लावला आहे.

श्वानांच्या सुरक्षिततेसाठी नवा प्रयत्न

केवळ दिवाळीतच नव्हे, तर वर्षभरात कधीही श्वान हरवल्यास त्यांचा सहज शोध घेण्यासाठी हे व्यासपीठ उपयुक्त ठरणार आहे. गरिमा सोळंकी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक रहिवासी, प्राणीप्रेमी आणि श्वानांना खाऊ घालणारे नागरिक आपल्या परिसरातील श्वानांची माहिती या वेबसाइटवर नोंदवू शकतात.

हिरेमठ फाउंडेशन आणि 'फॉर एव्हरी पॉज'चे योगदान

श्वानांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नोंदणीकृत श्वानांना हिरेमठ फाउंडेशन आणि उणझ तर्फे मोफत ठठ कोड कॉलर दिले जात आहेत. यामुळे कोणत्याही आर्थिक भाराशिवाय जास्तीत जास्त भटक्या श्वानांना सुरक्षा पुरवणे शक्य होणार आहे.

अध्यक्ष विवेकानंद एस. हिरेमठ यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेले हिरेमठ फाउंडेशन (hiremathfoundation.in) शिक्षण, युवक सक्षमीकरण, ग्रामीण विकास, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि प्राणी कल्याण यांसारख्या विविध क्षेत्रांत कार्य करत आहे. संस्थेने आतापर्यंत ५०० हून अधिक स्वयंसेवकांच्या मदतीने ३५ हून अधिक सामाजिक उपक्रम आणि ५० हून अधिक कार्यशाळांचे आयोजन केले आहे.

आपण मागे सोडून जाणारा खरा वारसा म्हणजे संपत्ती नसून, आपण निर्माण केलेल्या संधी हाच खरा वारसा आहे, या भावनेतून हे फाउंडेशन समाजोपयोगी कार्यात सक्रिय आहे.

फाउंडेशनचा प्राणी कल्याण विभाग असलेल्या 'फॉर एव्हरी पॉज' (For Every Paws) मार्फत भटके प्राणी, पाळीव प्राणी आणि वन्यजीवांच्या संरक्षणासाठी विविध उपक्रम राबवले जातात. यापूर्वी सोलापूरमध्ये भटक्या श्वानांसाठी ठठ कोड असलेले रिफ्लेक्टिव्ह सेफ्टी कॉलर सादर करण्यात आले होते. आता हाच प्रयत्न बंगळुरूमध्येही विस्तारण्यात आला असून, 'डॉग्ज ऑफ बंगळुरू' व्यासपीठाच्या माध्यमातून अधिकाधिक श्वानांना सुरक्षा देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

प्रत्येक श्वानाला सुरक्षित जीवन

'डॉग्ज ऑफ बंगळुरू' ही मोहीम केवळ दिवाळीपुरती मर्यादित न राहता, बंगळुरूमधील भटक्या श्वानांच्या सुरक्षिततेसाठी नागरिकांनी एकत्र येऊन केलेला एक स्तुत्य प्रयत्न आहे. तंत्रज्ञानाची प्राणी कल्याणाशी सांगड घालून हरवलेल्या श्वानांची त्यांच्या काळजीवाहकांशी पुन्हा भेट घडवून आणणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

वेबसाइट: https://dogsofbangalore.com

हिरेमठ फाउंडेशन: https://hiremathfoundation.in

भगवान बिरसा मुंडा जयंती निमित्त सेवा सप्ताहाचे आयोजन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/एस.के. गायकवाड : क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा जयंती निमित्ताने शासनाच्या वतीने जनजाती गौरव दिवस व सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून त्याचाच भाग म्हणून धाराशिव येथे जिल्हाधिकारी किर्तीकुमार पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली या सेवा सप्ताहास नुकतच सुरवात करण्यात आले असून या प्रसंगी पारधी आदिवासी विकास बहुउद्देशीय सामाजिक संस्था अणदूर ता. तुळजापूर चे संस्थापक अध्यक्ष पंडित बिटू भोसले यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.



गवान बिरसा मुंडा यांची जयंती जनजाती गौरव दिवस म्हणून पाळला जात असून या निमित्ताने सेवा सप्ताह २२६ चे आयोजन करण्यात आले आहे.या सेवा सप्ताहाला नुकतंच धाराशिव येथे जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजारी यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून सुरूवात करण्यात आले असून या सेवा सप्ताहाम ध्ये दि.११ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर २०२६ दरम्यान आरोग्य व पोषण, शिबिर,लाभार्थी मेळावा,शिक्षण जनजागृती



अभियान व सांस्कृतिक कार्यक्रम अशा प्रकारे विविध उपक्रम राबविले जाणार असल्याचे सागण्यात आले

या प्रसंगी आदिवासी पारधी समाज संघटनेचे नेते पंडित भोसले सह काही कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला.या वेळी प्रकल्प अधिकारी आदिवासी विभाग धनंजय झाकरे,शिक्षण विस्तार अधिकारी भगवान अंधळकर,आदिवासी विभाग निरीक्षक काशिनाथ राख, मुख्याध्यापक सतीश गायकवाड,वरिष्ठ अधिकारी गणेश पवार,पारधी आदिवासी विकास बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे सुनिता भोसले,सुनील काळे,रवी भोसले,प्रदीप भोसले,चित्रा काळे,ज्योती भोसले,कुंदन भोसले सह कर्मचारी अधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रामाणिकपणा आणि माणुसकी अजूनही जिवंत!

दीड तोळ्यांची सोन्याची पोत प्रामाणिकपणे केली परत



विंचूरच्या तुकाराम राऊत यांचे कौतुक

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

निफाड/प्रतिनिधी : देवगाव येथील अरुण गणपत अडांगळे यांच्या मुलीची सुमारे दीड तोळे वजनाची सोन्याची पोत बाजारच्या दिवशी देवगाव चौकातील प्रसिद्ध शरद वडेवाले (मयूर गायकवाड) यांच्या दुकानात हरवली होती. बाजारचा दिवस असल्याने दुकानात मोठी गर्दी होती. अरुण अडांगळे यांची मुलगी वडे घेण्यासाठी आली असता पर्समधून पैसे देताना त्यातील सोन्याची पोत दुकानात पडली. घरी गेल्यानंतर पोत हरवल्याचे लक्षात आले; मात्र ती नेमकी कुठे पडली, याचा अंदाज येत नव्हता. दरम्यान, विंचूर येथील पाव पुरवठादार तुकाराम गोविंद राऊत हे नेहमीप्रमाणे दुकानात पाव देण्यासाठी आले असता त्यांना ही पोत सापडली. त्या वेळी दुकानात अनेक महिला असल्याने त्यांनी कोणालाही न सांगता पोत सुरक्षितपणे घरी नेली. मात्र, दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी स्वतःहून मयूर गायकवाड यांना फोन करून पोत सापडल्याची माहिती दिली. पोत हरवल्यामुळे चिंतेत असलेल्या अरुण अडांगळे यांनी मयूर गायकवाड यांच्याकडे चौकशी केली असता पोत सुरक्षित असल्याचे समजले. त्यामुळे अरुण अडांगळे आणि त्यांच्या मुलीचा जीव भांड्यात पडला. आज सायंकाळी पाव देण्यासाठी आलेल्या तुकाराम राऊत यांनी संबंधित सोन्याची पोत प्रामाणिकपणे परत केली. त्यांच्या या प्रामाणिकपणाबद्दल सत्कार करण्याची तसेच बक्षीस देण्याची अडांगळे यांनी इच्छा व्यक्त केली असता राऊत यांनी सुरुवातीला नम्रपणे सत्कार आणि बक्षीस दोन्ही नाकारले. मात्र, उपस्थितांनी आग्रह धरल्यानंतर त्यांनी सत्कार स्वीकारला.

सर्वत्र स्वैराचार आणि बेइमानी वाढत असल्याची चर्चा होत असताना तुकाराम राऊत यांनी दाखवलेला प्रामाणिकपणा आणि माणुसकी निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांच्या या कृतीचे देवगाव परिसरातून अभिनंदन होत आहे.

अखिल पार्कसाईट सेवा संघाच्या वतीने २२ नोव्हेंबर रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई, (केतन भोज):मुंबईतील महापालिका तसेच सरकारी रुग्णालयांमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याने गरजू रुग्णांना रक्त उपलब्ध होण्यासाठी सामाजिक बांधिलकी जपत अखिल पार्कसाईट सेवा संघाच्या वतीने रविवार दिनांक २२ नोव्हेंबर २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.पार्कसाईट,विक्रोळी (पश्चिम) येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मैदान वेलफेअर सेंटर येथे सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत हे रक्तदान शिबिर पार पडणार आहे.रक्तदान हे श्रेष्ठदान असून एका व्यक्तीने केलेल्या रक्तदानामुळे गरजू रुग्णाला जीवनदान मिळू शकते.मुंबईतील विविध रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे,तसेच समाजामध्ये रक्तदानाविषयी जनजागृती निर्माण होऊन अधिकाधिक नागरिकांनी या सामाजिक कार्यात सहभागी व्हावे,या उदात्त हेतूने अखिल पार्कसाईट सेवा संघाने हा उपक्रम आयोजित केला आहे. विशेष म्हणजे,अखिल पार्कसाईट सेवा संघाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या रक्तदान शिबिराचे यंदा २९ वे वर्ष असून,गेल्या अनेक वर्षांपासून संघाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत रक्तदानाचा हा स्तुत्य उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे.रक्ताची गरज असलेल्या रुग्णांना मदतीचा हात मिळावा आणि रक्तदान चळवळ अधिक व्यापक व्हावी,यासाठी संघाकडून दरवर्षी हा उपक्रम राबविण्यात येतो.यंदाच्या शिबिरातही परिसरातील तरुण,महिला,सामाजिक कार्यकर्ते,विविध संस्था आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे,असे आवाहन अखिल पार्कसाईट सेवा संघाच्या वतीने करण्यात आले आहे.समाजातील प्रत्येक सक्षम नागरिकाने रक्तदानाचे महत्त्व ओळखून पुढाकार घेतल्यास अनेक गरजू रुग्णांना मदत होऊ शकते.

१८ ते २४ नोव्हेंबरदरम्यान प्रतिबंधात्मक आदेश लागू - उपविभागीय अधिकारी सचिन इथापे

कार्तिकी यात्रेत अनधिकृत होर्डिंग्ज, फ्लेक्स व डिजिटल फलकांना बंदी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कार्तिकी यात्रा २०२६ च्या पार्श्वभूमीवर भाविकांची सुरक्षितता आणि सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी पंढरपूर शहरासह पंढरपूर व मोहोळ तालुक्यांतील सार्वजनिक ठिकाणी अनधिकृत होर्डिंग्ज, बॅनर्स, फ्लेक्स व डिजिटल फलक लावण्यास बंदी घालण्यात आली आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी सचिन इथापे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये दि. १८ ते २४ नोव्हेंबर २०२६ या कालावधीसाठी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

आषाढी यात्रेदरम्यान सुमारे ३० फूट उंचीचे दोन डिजिटल फलक कोसळल्याच्या घटना घडल्या होत्या. या पार्श्वभूमीवर संभाव्य जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे.

मंदिर परिसर, चंद्रभागा नदी व घाट, ६५ एकर परिसर, पालखी मार्ग, प्रमुख रस्ते, चौक, एसटी व रेल्वे स्थानक, तहसील कार्यालय आणि हेलिपॅड परिसरासह सर्व सार्वजनिक ठिकाणी हे निर्बंध लागू राहतील. रस्ता दुभाजक, विद्युत खांब, झाडे, पूल, पदपथ आणि शासकीय इमारतींवर फलक लावण्यास पूर्णतः मनाई करण्यात आली आहे.

परवानगीयोग्य ठिकाणी फलक उभारण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याची लेखी परवानगी आणि आवश्यकतेनुसार नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअरचे स्थैर्य प्रमाणपत्र बंधनकारक राहणार आहे. मुद्रक व प्रिंटिंग व्यावसायिकांनीही परवानगीशिवाय फलक छापू नयेत.

आदेशाचे उल्लंघन करणारे अनधिकृत फलक नगरपरिषद व पोलीस प्रशासनाकडून हटविण्यात येणार असून संबंधितांकडून खर्च वसूल केला जाणार आहे. उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ व महाराष्ट्र मालमत्ता विद्रूपण प्रतिबंधक अधिनियम १९९५ नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

यात्रेच्या काळात भाविकांची सुरक्षितता लक्षात घेऊन सर्व संबंधितांनी प्रतिबंधात्मक आदेशांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज

आषाढी वारीच्या नियोजनाप्रमाणेच कार्तिकी वारी यशस्वी करा : पालकमंत्री जयकुमार गोरे

कार्तिकी यात्रेत स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य; वारकऱ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून द्या



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : आषाढी वारीच्या नियोजनाचे आणि वारकऱ्यांना उपलब्ध करून दिलेल्या सुविधांचे देशभरात कौतुक झाले आहे. त्याच धर्तीवर यंदाची कार्तिकी वारीही यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित शासकीय विभागांनी जबाबदारीने व परस्पर समन्वयाने काम करावे. कार्तिकी यात्रेत स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देऊन पंढरपूर शहरात सर्वत्र स्वच्छता राखावी. वारकऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही, अशी ग्वाही ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

सर्व विभागांनी जबाबदारीने व परस्पर समन्वयाने काम करावे; निधीची कमतरता भासू देणार नाही

या बैठकीस जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभिजीत औटी, व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे आमदार समाधान आवताडे, आमदार अभिजीत पाटील, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

कार्तिकी यात्रेत राज्याच्या विविध भागांतून लाखो वारकरी व भाविक पंढरपुरात येतात. यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. सुविधांमध्ये कोणतीही कमतरता राहणार नाही, याची संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले.

जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि नगरपालिकेने आपल्या हद्दीतील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून खड्डे बुजवावेत. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत. दर्शन रांगेतील भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, शौचालये, मॅट आणि पुरेशा प्रकाशाची व्यवस्था करावी. आषाढी यात्रेच्या वेळी उपलब्ध करून दिलेल्या सुविधांप्रमाणेच कार्तिकी यात्रेतही सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.



दर्शन रांगेत घुसखोरी होणार नाही, यासाठी पोलीस प्रशासन आणि मंदिर समितीने आवश्यक उपाययोजना कराव्यात. भाविकांना जलद व सुलभ दर्शन मिळण्यास प्राधान्य द्यावे. व्हीआयपी दर्शन व्यवस्था पूर्णपणे बंद ठेवावी. मंदिर समितीने प्रशिक्षित सुरक्षारक्षक नेमावेत. त्यांच्या चारित्र्याची पडताळणी करून अहवाल सादर करावा. मंदिर समितीचे कर्मचारी व सुरक्षारक्षकांनी भाविकांशी सौजन्याने वागावे. शासकीय महापूजेचे नियोजन पोलीस प्रशासनाच्या सूचनांनुसार करावे, असेही त्यांनी सांगितले.

भाविकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी पाण्याची नियमित तपासणी करावी. महावितरणने यात्राकाळात अखंडित व सुरक्षित वीजपुरवठा करावा. नदीपात्रात होडीतून प्रवास करणाऱ्या भाविकांसाठी पुरेशा प्रमाणात लाईफ जॅकेट उपलब्ध करून द्यावेत. पंढरपूर शहर व परिसरात मांस-मटण आणि मद्यविक्री पूर्णपणे बंद ठेवण्याबाबतही त्यांनी सूचना दिल्या.

वाखरी येथे जनावरांचा मोठ्या प्रमाणात बाजार भरत असल्याने त्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. बाजार संपल्यानंतर पालखी-तळाची स्वच्छता करावी. यात्राकाळात सोपविण्यात आलेली कामे सर्व विभागांनी जबाबदारीने आणि परस्पर समन्वयाने पूर्ण करावीत. यंदाची कार्तिकी यात्रा सुरक्षित, सुरळीत व सुखकर पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी नियोजनबद्ध काम करावे. प्रादेशिक परिवहन विभागाने वारकऱ्यांच्या वाहनांना विनाकारण अडचणी निर्माण करू नयेत, असेही पालकमंत्री गोरे यांनी निर्देशित केले.

प्रारंभी उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी प्रशासनाने कार्तिकी वारीच्या अनुषंगाने केलेल्या तयारीची माहिती मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सादर केली. तर मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी मंदिर समितीमार्फत भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा व शासकीय महापूजेच्या नियोजनाबाबतची माहिती दिली तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी कार्तिकी वारीच्या नियोजनाची माहिती बैठकीत दिली.

पंढरपूर पोलिसांची मोठी कारवाई, राजा भिंगे यांच्यावर गोळीबार करणारा आरोपी अटकेत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर इसबावि येथे शिवा संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजा भिंगे यांच्यावर राहत्या घरात झालेल्या गोळीबार प्रकरणात पंढरपूर शहर पोलीस आणि मोठी कारवाई केली आहे. हा गोळीबार करणार आरोपी पंढरपूर शहर पोलिसांच्या अटकेत आहे.

बाबी इथे राहत्या घरात अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केल्याने राजा भिंगे यांचा जागीर मृत्यू झाला. होता व त्यांना तात्काळ पंढरपूर येथील लाईफलाने सुपर स्पेशलिस्ट हॉस्पिटलमध्ये दाखल केले असता



डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

पंढरपूर शहरामध्ये कार्तिक यात्रेची लगबग सुरू असतानाच घडलेल्या घटनेमुळे पंढरपूर शहर हादरले होते. पंढरपूर शहरात भीतीचे वातावरण पकडले होते.

पोलिसांनी आपली चक्री




भरून कशी केली अटक, घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक प्रेरणा कट्टे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश ढवान यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पटकन तपास सुरू केला.

परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक माहिती व गोपनीय माहिती कडून मिळालेली माहिती. आधारे शोध घेऊन त्यांना आरोपीस अटक करण्यात आली.

आरोपीकडून गोळीबार साठी वापरलेले हत्यार तसेच या गुन्ह्यातील अनेक नेमके कारण काय आहे. त्याचा पोलीस कुसुम तपास करत आहे. या मुलींमध्ये आणखी कोणी आहे का याचाही शोध घेत आहेत.

आरोपीच्या अटकेमुळे शहरात दिलासा मिळाला. आरोपी अटकेत आल्यामुळे पंढरपूरकरांना थोडा दिलासा मिळाला. पोलिसांच्या या धडक व जलद कारवाईमुळे पोलिसांची कौतुक होत आहे. पुढील तपास पंढरपूर शहर पोलीस करत आहेत.

पंढरपूर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर (प्रतिनिधी) पंढरपूर चिंचोली फाटा येथे वै.ह.भ.प. गंगाधर महाराज डावरे दिंडी ट्रस्टच्या वतीने व वै.ह.भ.प. पंढरीनाथ डावरे महाराज यांच्या आशीर्वादाने१८ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर या कालावधीमध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ह.भ.प. बाळकृष्ण डावरे, ह.भ.प. गंगाधर जाधव, ह.भ.प मोहन जाधव यांनी दिली.

अखंड हरिनाम सप्ताह मध्ये दररोज पहाटे ५ ते ६ काकडा सकाळी ७ ते ९ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी १० ते १२ हरिकीर्तन, दुपारी ३ ते ४ गाथा भजन, सायंकाळी ४ ते ५ हरिपाठ, सायंकाळी ७ते ८ हरी किर्तन आधी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अखंड हरिनाम सप्ताह यशस्वी करण्यासाठी वै. ह भ प गंगाधर महाराज डावरे दिंडी समाज ट्रस्ट धर्मशाळा व सर्व भाविक भक्त परिश्रम घेत आहेत.

कालचक्रात अडकवणाऱ्या 'अनादी १०:१०' नाटकाचा प्रयोग संपन्न

आचार्य अत्रे रंगमंदिरात नाट्यप्रयोगाला उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कल्याण/केतन भोज : ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत ग्रामीण कला मंच प्रस्तुत 'अनादी १०:१०' या दोन अंकी नाटकाचा प्रयोग मंगळवार, १७ नोव्हेंबर रोजी कल्याण येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात उत्साहात पार पडला. काळाच्या अनाकलनीय चक्रात अडकलेल्या रेल्वे स्थानकावरील प्रवाशांची रहस्यमय कथा मांडणाऱ्या या नाटकाला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली.

लेखक, निर्माता व दिग्दर्शक उमेश मारुती भेरे यांनी वेगळ्या विषयाची मांडणी करत रहस्य, भीती, विनोद आणि भावनिक प्रसंगांची सुरेख गुंफण साधली.



प्रभावी संवाद, दमदार अभिनय, नेपथ्य, प्रकाशयोजना आणि पार्श्वसंगीत यामुळे नाटकातील उत्कंठा शेवटपर्यंत कायम राहिली. प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात कलाकारांचे कौतुक केले.नाटकाची प्रकाशयोजना विराज देसाई व चैतन्य पाणवळकर, रंगमंच सजावट संतोष जाधव व मैथिली उमेश भेरे, वेशभूषा मैथिली उमेश भेरे, रंगभूषा सोहम कोचरेकर आणि नृत्य दिग्दर्शन ऐश्वर्या विशे यांनी केले.नाटकात नितीन गाडेकर, महेंद्र जाधव, ऐश्वर्या विशे, सुशील शिरसाठ, अरुण चौधरी, दिप्ती वाकचौरे, प्रसाद वैद्य, धनेश पाटोळे, अविनाश दलाल, केशव भागाडे, किमया वेखंडे आणि प्रीतम हजारे यांनी भूमिका साकारल्या.ग्रामीण कला मंचच्या या नाट्यप्रयोगाला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा कलाकारांच्या मेहनतीची आणि दर्जेदार नाट्यनिर्मितीच्या प्रयत्नांची पावती ठरला.

बाळासाहेबांच्या आठवणींना डॉ. नीलम गोऱ्हे भावूक; शिवसैनिकांना घडवण्यास पुण्यात प्रशिक्षण केंद्राचा संकल्प

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : बाळासाहेबांच्या निधनाचा तो दिवस आजही डोळ्यासमोर चौदाव्या स्मृतिदिनी डॉ. नीलम गोऱ्हे भावपूर्ण शिवसैनिकांसाठी प्रशिक्षण केंद्र उभारणार

बाळासाहेब ठाकरे यांच्या चौदाव्या स्मृतिदिनी डॉक्टर नीलम गोऱ्हयांनी पुण्यात अभिवादन केले.


बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनाचा दिवस आजही डोळ्यासमोर उभा राहतो नीलम गोऱ्हे १७ नोव्हेंबर रोजी शरद भाऊ येथील बाळासाहेब ठाकरे त्यांच्या शिल्पास डॉक्टर नीलम गोऱ्हे आणि पुष्पर अर्पण करून अभिवादन केले होते त्यानंतर शिवसेनेचे पुणे शहर मध्यवर्ती कार्यालयातील बाळासाहेब भवन येथे पदाधिकाऱ्यांच्या श्रद्धांजली वाहण्यात आली.

बाळासाहेबांची पुण्यस्मरण विशेष प्रेम व बाळासाहेबांची पुण्यावर विशेष प्रेम होते व अलका टॉकीज जवळ परिसरातील त्यांच्या अनेक सवाई झाल्या होत्या भेटीदरम्यान ती पुणे पुण्यातील राजकीय आणि सामाजिक घडामोडींची आवर्जून ती चौकशी करायचे तसेच प्रबोधनकार ठाकरे यांच्या पुण्यतिथी ला वास्तव्याच्या आठवणी सांगायचे असे आमदार डॉक्टर नीलम गोऱ्हे त्यांनी व्यक्त केले.

बाळासाहेब हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्वाचा विचार शिवसेना मुख्य देणे तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पुढे नेला जात असल्याने डॉक्टर नीलम गोऱ्हे यांनी सांगितले यावेळी त्यांनी अयोध्येतील राम मंदिर कलम ३०० रद्द करण्यात निर्णय श्रीनगरच्या लाल चौकात तिरंगा फडकवण्याची बाळासाहेबांचे स्वप्न आणि सन्मान नागरिक कायद्याच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांचा उल्लेख केला.



दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलताना धर्मवीर आनंद दिघे यांच्या शिकवणे अनुसार शिवसैनिक मदत कार्य करीत असल्याची त्यांनी सांगितली व शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ नये नाही या उपमुख्यत एकनाथ शिंदे यांच्या आश विविध भागात शेतकऱ्यांना मदत पोहोचवण्याची आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



ऊसाला पहिली उचल ३५०० मिळेपर्यंत कारखाने बंद ठेवा; राजू शेट्टींच्या इशाऱ्यानंतर सोलापुरातील शेतकरी रस्त्यावर

ऊस वाहतूक सुरू ठेवल्यास ट्रॅक्टरचे टायर फोडू

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख राजू शेट्टींच्या इशाऱ्यानंतर सोलापुरातील शेतकऱ्यांनी ऊसाची वाहतूक रोखण्यास सुरुवात केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील शेतकरी आक्रमक झाले आहेत, वाहतूक सुरू ठेवली तर ट्रॅक्टरची टायर फोडली जातील असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

जोपर्यंत ऊसाला पहिली उचल ३५०० रुपये मिळत नाही तोपर्यंत कारखाने बंद ठेवण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. १९ तारखेला पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखानदारांची बैठक होणार आहे. या बैठकीत ३५०० रुपयांचा दर जाहीर नाही केला तर अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. १९ तारखेपर्यंत साखर कारखान्यांनी ऊसाची तोडणी बंद करावी, अशा आशयाचे पत्रक देखील सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून काढण्यात आले आहेत.

स्वाभिमानीने देताना सांगितलं की, १९ नोव्हेंबरला सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढणार आहोत. सोलापूर जिल्ह्यातील कारखानदारांनी तोडगा मान्य न केल्यास सोलापूर जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीय महामार्ग व सोलापूर रेल्वे स्टेशनवर रेल्वे रोको आंदोलन केलं जाणार आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी लाखोंच्या संख्येने सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे उपस्थित रहावे, असे आवाहन राजू शेट्टींनी केले आहे.

१६ नोव्हेंबरला सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा प्रचंड मोर्चा निघाला आणि या मोर्चाची दखल घेऊन अखेर सरकारला नमते घ्यावं लागलं. रात्री एक वाजता सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी १९ नोव्हेंबरला जोपर्यंत पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कारखानदार आणि शेतकरी प्रतिनिधी यांच्यामध्ये ऊस दराबद्दल बैठक होत नाही, तोपर्यंत आजपासून जिल्ह्यातले सगळे कारखाने बंद ठेवण्याचा आदेश स्वतःच्या अधिकारामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी दिला. आणि मग प्रशासनाची विनंती मान्य करून कालचा धरणे आंदोलन काही काळासाठी तहकूब करण्यात आलं. १९ नोव्हेंबरला साडेतीन हजार रुपये पहिली उचल देण्यासंदर्भात तोडगा नाही निघाला तर आलेल्या साखर कारखानदारांना आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर जाऊन देणार नाही, हा निर्णय आम्ही घेतलेला अहे.

बैठकीपर्यंत गाळप बंद ठेवण्याचे आदेश

माजी खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वात सोलापुरात सुरू असलेलं ऊस दर आंदोलन अखेर स्थगित करण्यात आलं आहे. ऊस दराच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १९ नोव्हेंबर रोजी बैठक होणार आहे. ऊस दराबाबत बैठक होईपर्यंत साखर कारखान्यातील गाळप बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी राजू शेट्टी यांना कारखाने बंद करण्याचे लिखित आदेशाची प्रत दिली.

सोलर पंपा द्वारे ठिबक सिंचनाचा अवलंब करून पीक जगण्याचा प्रयत्न

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

करमाळा : शेतात बसवलेली सोलर, याद्वारे पिकांना पाणी देण्यात येत आहे यापूर्वी तुटकूंच्या पावसामुळे सर्वत्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असताना हिरवे येथील योगेश ओव्हाळ या अल्पभूधारक युवकाने सोलर पंपाद्वारे ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करून वडिलांनी घेतलेले ज्वारीचे पीक जगवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. करमाळा तालुक्यात हिवरे शिवारात युवराज ओव्हाळ यांनी एक एकर जिराईक जमीन आहे कुटुंबासाठी वर्षभर पुरेल या हिशोबाने या क्षेत्रात ही ज्वारीची पीक घेतात. यावर्षी झालेल्या जेमतेम पावसामुळे अनेक ठिकाणी ज्वारीचे पीक उगवून आले असले तरी रखरखीत ऊन आणि पावसाच्या अभावामुळे हे पीक जगणे दुरापास्त आहे मात्र वडिलांनी कष्टाने पेरलेले पीक वाया जाऊ नये या उद्देशाने योगेशने निसर्गाच्या या प्रकल्पाचे संधील रूपांतर करण्याच्या हेतूने या शेतात सोलर बसवून जेमतेम पाणी असणाऱ्या बोरला ठिबक सिंचनाचे पाईप जोडून ज्वारीचे पीक जगवण्याचा प्रयत्न सुरू केला आहे दिवसभरात हा बोर केवळ दोन ते अडीच तास चालत असल्याने पूर्ण एक एकरातील पिकांना पाणी मिळावे योगेश ने अडीच इंची पाईप वापरून ठिबकच्या नळ्या जोडून हा जुगाड त्यांनी तयार केला आहे.